# नेहमी विचारले जाणारे प्रश्न

1. **प्रोसेसिंग फी म्हणजे काय?**

प्रोसेसिंग फी म्हणजे तुमच्या लोन ॲप्लिकेशनच्या प्रशासकीय प्रक्रिया खर्चासाठी आकारली जाणारी रक्कम होय

2. **थकित शुल्क म्हणजे काय?**

EMI पेमेंट वेळेवर न केल्यास आकारले जाणारे शुल्क म्हणजे थकीत शुल्क होय.

3. **बाउन्स शुल्क म्हणजे काय?**

EMI पेमेंट अयशस्वी झाल्यास दंड म्हणून आकारले जाणारे शुल्क म्हणजे बाऊन्स शुल्क होय. हे बँक अकाउंटमध्ये अपुरा बॅलन्स, इनॲक्टिव्ह किंवा क्लोज्ड अकाउंट किंवा बँकेकडील तांत्रिक अडचणींमुळे होऊ शकते.

या शुल्कांच्या आकारणी बाबत अधिक जाणून घेण्यासाठी, येथे क्लिक करा.

अयशस्वी EMI पेमेंट तुमच्या क्रेडिट रेकॉर्डमध्ये देखील दिसून येऊ शकते.

4. **थकित लोन अकाउंटमध्ये पार्ट-प्रीपेमेंट करण्यासाठी अनुमती असलेली किमान आणि कमाल रक्कम किती आहे?**

   पार्ट-प्रि-पेमेन्ट करण्यासाठी किमान रक्कम ₹1 असावी. जास्तीत जास्त रक्कम आपल्या कर्जाच्या एकूण बकाया मुख्य रकमेपेक्षा कमी असू शकते.

5. **एकदा मी पार्ट-प्रीपेमेंट पूर्ण केल्यानंतर, माझी EMI रक्कम कमी होईल की माझा कालावधी कमी होईल?**

   पूर्णपणे वितरित (fully disbursed) कर्जासाठीच तुम्हाला हा पर्याय उपलब्ध आहे की पार्ट-प्रिपेमेंटचा परिणाम EMI वर होईल की कर्जाच्या कालावधीवर (tenure).
   Flexi किंवा अंशतः वितरित (partial disbursement) कर्जाच्या बाबतीत, पार्ट-प्रिपेमेंटचा परिणाम डिफॉल्टने फक्त EMI वर लागू होतो.
   आणि जर पार्ट-प्रिपेमेंट eCMS द्वारे केली गेली असेल, तर त्याचाही परिणाम डिफॉल्टने फक्त EMI वरच लागू होतो.

6. **माझ्या अकाउंट स्टेटमेंटमध्ये पार्ट-प्रीपेमेंट कधी दिसून येईल?**

जर पेमेंट "Payment Gateway" द्वारे केले असेल, तर आम्हाला निधी प्राप्त झाल्यानंतर 48 तासांच्या आत तुमच्या स्टेटमेंट ऑफ अकाउंटमध्ये पार्ट-प्रिपेमेंट रक्कम दिसेल. आणि जर पेमेंट eCMS द्वारे कामकाजाच्या दिवशी संध्याकाळी 5 वाजण्यापूर्वी केले असेल, तर ती रक्कम त्याच दिवशी तुमच्या स्टेटमेंटमध्ये दिसेल.

7. **जर माझ्या लोन अकाउंटमध्ये थकित असेल तर मला पार्ट-प्रीपेमेंट करता येईल का?**

तुम्ही तुमची थकबाकी (overdue amount) भरल्यानंतरच पार्ट-प्रिपेमेंट करू शकता. तुम्ही आमच्या कस्टमर पोर्टलद्वारे ऑनलाइन थकबाकी रक्कम भरू शकता.

8. **मी माझ्या इन्श्युरन्स पॉलिसीमध्ये बदल किंवा सुधारणा कशा करू?**

तुमच्या इन्श्युरन्स पॉलिसीमध्ये सुधारणा करण्यासाठी, जसे की जन्मतारीख, PAN किंवा नावातील बदल, तुमच्या रजिस्टर्ड संपर्क तपशीलांचा वापर करुन bhflwecare@bajajhousing.co.in वर कळवा.

वैकल्पिकरित्या, तुम्ही तुमच्या पॉलिसी डॉक्युमेंटमध्ये नमूद केलेल्या कस्टमर सर्व्हिस तपशीलांचा वापर करून थेट तुमच्या इन्श्युररशी संपर्क साधू शकता.

9. **मला माझी रिपेमेंट देय तारीख बदलता येईल का? जर होय असेल, कसे?**

होय, तुम्ही तुमच्या रिपेमेंटची देय तारीख म्हणून प्रत्येक महिन्याच्या 2 किंवा 5 दरम्यान तारीख निवडू शकता. बदलाची विनंती करण्यासाठी, तुमचे रजिस्टर्ड संपर्क तपशील वापरून bhflwecare@bajajhousing.co.in वर लिहा.

तुमच्या आगामी EMI वर बदल लागू असल्याची खात्री करण्यासाठी, तुमच्या वर्तमान देय तारखेच्या किमान 10 दिवस आधी तुमची विनंती सबमिट करा. उदाहरणार्थ, जर तुमचा EMI पुढील महिन्याच्या 2 तारखेला देय असेल आणि तुम्हाला ती तारीख बदलून 5 करायची आहे, तर तुम्हाला चालू महिन्याच्या 22 तारखेला (30-दिवसांचा महिना विचारात घेता) किंवा त्याआधी विनंती सबमिट करावी लागेल.

दिवसांच्या संख्येतील बदलामुळे तुमच्या EMI चा इंटरेस्ट घटक तात्काळ सायकलसाठी बदलू शकतो. वरील उदाहरणात, देय तारीख पुढे ढकलण्यात आल्याने, इंटरेस्ट घटक केवळ त्या EMI साठी वाढतो.

जर तुम्ही तुमच्या EMI ची तारीख अलीकडे घेतली, तर EMI ची रक्कम तीच राहते. तथापि, इंटरेस्ट घटक कमी होतो आणि प्रिन्सिपल घटक त्याच प्रमाणात वाढतो.

10. **माझी EMI देय तारीख बदलल्यास माझ्या रिपेमेंट शेड्यूलवर कसा परिणाम होतो?**

जर तुम्ही एकाच महिन्यामध्ये तुमच्या EMI ची तारीख पुढे ढकलली, तर दिवसांच्या संख्येतील फरकासाठी अतिरिक्त इंटरेस्ट आकारले जाते. हे केवळ त्यानंतरच्या EMI वर लागू होते.

जर तुम्ही तुमच्या EMI ची तारीख अलीकडे घेतली, तर तुमच्या पुढील महिन्याचा EMI अपरिवर्तित राहील. तथापि, इंटरेस्ट मधील घट भरून काढण्यासाठी प्रिन्सिपल घटक वाढवला जातो.

**11. मी माझा EMI वाढवू शकेल का?**

होय, तुम्ही तुमचा EMI वाढवू शकता किंवा तुमचा कालावधी कमी करू शकता. तुम्ही हे कसे करू शकता हे येथे दिले आहे:

जर तुम्ही BHFL कस्टमर पोर्टल वापरत असाल:

1. तुमचे रजिस्टर्ड संपर्क तपशील किंवा CIF आणि पासवर्ड वापरून लॉग-इन करा
2. डाव्या बाजूच्या मेन्यूमधून 'माझे लोन मॅनेज करा' पर्याय निवडा आणि उघडा
3. ड्रॉपडाउन पर्यायांमधून 'माझा EMI वाढवा' पर्याय निवडा
4. तुमच्याकडे एकापेक्षा जास्त लोन असल्यास तुमचा लोन अकाउंट नंबर निवडा
5. परिणाम निवडा, म्हणजेच, तुम्हाला तुमचा EMI वाढवायचा आहे की तुमचा कालावधी कमी करायचा आहे ते ठरवा
6. सुधारित EMI रक्कम किंवा सुधारित कालावधी पुन्हा एन्टर करा
7. आवश्यक तपासणी पूर्ण करा, OTP जनरेट करा आणि तुमची विनंती कन्फर्म करण्यासाठी सबमिट करा

जर तुम्ही BHFL मोबाईल ॲप वापरत असाल:

1. तुमचे रजिस्टर्ड संपर्क तपशील किंवा CIF आणि पासवर्ड वापरून लॉग-इन करा
2. 'क्विक लिंक्स' सेक्शन मधून 'माझा EMI वाढवा' निवडा
3. तुमच्याकडे एकापेक्षा जास्त लोन असल्यास तुमचा लोन अकाउंट नंबर निवडा
4. परिणाम निवडा, म्हणजेच, तुम्हाला तुमचा EMI वाढवायचा आहे की तुमचा कालावधी कमी करायचा आहे ते ठरवा
5. सुधारित EMI रक्कम किंवा सुधारित कालावधी पुन्हा एन्टर करा
6. आवश्यक तपासणी पूर्ण करा, OTP जनरेट करा आणि तुमची विनंती कन्फर्म करण्यासाठी सबमिट करा

कृपया नोंद घ्या:

- जर तुमचे लोन पूर्णपणे वितरित झाले असेल, तर तुम्ही सेल्फ-सर्व्हिस पर्यायाद्वारे हा बदल तुमचा EMI वाढवण्यासाठी करायचा की कालावधी कमी करण्यासाठी करायचा हे निवडू शकता
- जर तुमचे लोन अंशत: वितरित झाले असेल तर कालावधी सुधारण्याचा पर्याय पोर्टलवर उपलब्ध नसतो. अशा प्रकरणांमध्ये, तुमचे रजिस्टर्ड संपर्क तपशील वापरून bhflwecare@bajajhousing.co.in वर लिहा
- जर तुमचे लोन फ्लेक्सी व्हेरियंट अंतर्गत असेल तर रेट सुधारणेचा परिणाम केवळ EMI रकमेमध्ये दिसून येतो. कृपया तुमच्या रजिस्टर्ड ईमेल ID वर पाठवलेला तपशीलवार रेट सुधारणा ईमेल पाहा

**12. मी माझा EMI करू शकेल का?**

तुम्ही पार्ट-प्रीपेमेंट करून आणि कालावधी ऐवजी EMI रक्कम कमी करण्याची निवड करून तुमची EMI रक्कम कमी करू शकता.

कृपया लक्षात घ्या की तुम्ही तुमचा कालावधी वाढवून तुमचा EMI कमी करू शकत नाही.

**13. मला माझा EMI कमी करण्यासाठी माझा कालावधी वाढवता येईल का?**

तुमचा लोन कालावधी कंपनीच्या क्रेडिट आणि रिस्क पॉलिसीनुसार निर्धारित केला जातो आणि लोन वितरित झाल्यानंतर स्वैच्छिकपणे वाढविला जाऊ शकत नाही.

इंटरेस्ट रेट्समधील बदल, कंपनीच्या अंतर्गत पॉलिसी, रेग्युलेटरी आवश्यकता किंवा लोन डिफॉल्ट यासारख्या घटकांवर आधारित हे बदलू शकते.

**14. मला प्री-EMI चे EMI मध्ये रूपांतरण करता येईल का?**

जर तुमचे लोन सध्या प्री-EMI मोडमध्ये असेल, जिथे तुम्ही केवळ इंटरेस्ट घटक भरत आहात, तर तुम्ही त्यास EMI मोडमध्ये रूपांतरित करण्याची विनंती करू शकता, जिथे प्रिन्सिपल आणि इंटरेस्ट दोन्ही देय असतात.

BHFL कस्टमर पोर्टलद्वारे याची विनंती करण्यासाठी, कृपया खाली नमूद केलेल्या स्टेप्सचे अनुसरण करा:

1. तुमचे रजिस्टर्ड संपर्क तपशील किंवा CIF आणि पासवर्ड वापरून लॉग-इन करा
2. 'माझे लोन मॅनेज करा' निवडा आणि ड्रॉपडाउन पर्यायांमधून 'प्री-EMI चे EMI मध्ये रूपांतरण करा' निवडा
3. तुमचा लोन अकाउंट नंबर निवडा आणि 'पुढे सुरू ठेवा' वर क्लिक करा
4. OTP जनरेट आणि सबमिट करून तुमची विनंती कन्फर्म करा

वैकल्पिकरित्या, तुम्ही विनंती करण्यासाठी **bhflwecare@bajajhousing.co.in** वर लिहू शकता. तुम्ही 48 तासांच्या आत प्रतिसादाची अपेक्षा करू शकता.

**15. मला माझी प्रलंबित वितरण रक्कम कशी मिळवता येईल?**

तुमची प्रलंबित वितरण रक्कम प्राप्त करण्यासाठी, तुम्हाला तुमच्या विक्री प्रतिनिधीशी संपर्क साधण्याची विनंती केली जाते.

सर्व आवश्यक डॉक्युमेंट्स सबमिट आणि पडताळणी झाल्यानंतर, तुमच्या मंजुरी पत्रात नमूद केलेल्या अटींनुसार वितरण रिलीज केले जाईल.

**16. मला माझी वैयक्तिक माहिती जसे की जन्मतारीख, कम्युनिकेशन ॲड्रेस, ईमेल ID आणि मोबाईल नंबर कसे बदलता येईल?**

तुम्ही बजाज हाऊसिंग फायनान्स कस्टमर पोर्टल किंवा ॲपमार्फत तुमचा रजिस्टर्ड ईमेल ID आणि मोबाईल नंबर अपडेट करण्याची विनंती करू शकता. तुम्ही तुमचा कम्युनिकेशन ॲड्रेस अपडेट करण्यासाठी पोर्टल किंवा ॲपवर विनंती देखील करू शकता.

तुमच्या विनंतीवर प्रोसेस करण्यासाठी, तुम्हाला वैध ID पुरावा शेअर करणे आवश्यक आहे, जसे की:

• PAN कार्ड

• पासपोर्ट

• मतदान ओळखपत्र

• वाहन परवाना

• आधार कार्ड

तुमची जन्मतारीख अपडेट करण्यासाठी, bhflwecare@bajajhousing.co.in वर लिहा आणि विनंती पुढे नेण्यासाठी प्रतिनिधी तुमच्याशी संपर्क साधेल. वैकल्पिकरित्या, तुम्ही तुमच्या नजीकच्या BHFL शाखेला भेट देऊ शकता.

**17. मला माझी प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) सबसिडी ॲप्लिकेशनची स्थिती कशी तपासता येईल?**

PMAY सबसिडी ही केंद्र सरकारची स्कीम आहे आणि बजाज हाऊसिंग फायनान्स तुमची पात्रता तपासते आणि केस-बाय-केस आधारावर संबंधित सरकारी प्राधिकरणांना तुमचे ॲप्लिकेशन फॉरवर्ड करते.

PMAY स्कीमनुसार आवश्यक डॉक्युमेंट्स सबमिट केल्यानंतर, अधिकाऱ्यांकडून ॲप्लिकेशनचा आढावा घेतला जातो. प्रदान केलेल्या तपशिलानुसार सबसिडी मंजूर केली किंवा नाकारली जाऊ शकते.

जर मंजूर झाले तर सबसिडीची रक्कम तुमच्या लोन अकाउंटमध्ये जमा केली जाते आणि तुमच्या EMI सापेक्ष ॲडजस्ट केली जाते.

जर तुमच्याकडे तुमचा PMAY ॲप्लिकेशन ID असेल तर तुम्ही अधिकृत PMAY वेबसाईट वर स्थिती ट्रॅक करू शकता.

**18. फ्लेक्सी लोन म्हणजे काय?**

फ्लेक्सी लोन, नियमित टर्म लोनप्रमाणेच, तुम्हाला कोणत्याही वेळी पार्ट-प्रीपे आणि फंड विद्ड्रॉ करण्याची परवानगी देते. हे तुम्हाला तुमचा कॅश फ्लो अधिक कार्यक्षमतेने मॅनेज करण्याची लवचिकता देते.

**19. मला माझ्या फ्लेक्सी लोन अकाउंटवर ट्रान्झॅक्शन कधी सुरू करता येईल?**

तुम्ही लोन वितरणानंतर तुमच्या फ्लेक्सी लोन अकाउंटवर ट्रान्झॅक्शन सुरू करू शकता. तुम्ही कस्टमर पोर्टल, 24x7 द्वारे फंड विद्ड्रॉ आणि पार्ट-प्रीपे करू शकता.

**20. माझ्या फ्लेक्सी लोन अकाउंटवर विद्ड्रॉलची विनंती केल्यानंतर मला फंड कधी प्राप्त होतील?**

तुम्ही कस्टमर पोर्टलद्वारे विनंती केल्यानंतर 24 तासांच्या आत (बँकिंग तास) तुमच्या बँक अकाउंटमध्ये फंड जमा केले जातात.

**21. AMC म्हणजे काय आणि ते माझ्या अकाउंटवर का आकारले जाते?**

फ्लेक्सी ही BHFL द्वारे उपलब्ध असलेली खास सुविधा आहे. यामध्ये तुम्ही अतिरिक्त रक्कम तुमच्या फ्लेक्सी अकाउंट मध्ये जमा करून इंटरेस्ट मध्ये बचत करू शकता आणि तुमच्या आवश्यकतेनुसार केव्हाही रक्कम विद्ड्रॉ करू शकता

तुमच्या मंजुरी पत्रामध्ये नमूद केल्यानुसार, AMC शुल्क हे दरवर्षी ड्रॉप लाईन मर्यादेवर अर्थात, प्रत्येक वर्षाच्या समाप्तीवेळी असलेल्या मर्यादेवर आकारले जाते. पहिल्या वर्षात, लोन वितरणाच्या वेळी AMC आगाऊ आकारले जाते.

जर तुम्हाला AMC भरणे बंद करायचे असेल तर तुम्ही तुमच्या नजीकच्या BHFL शाखेला भेट देऊन आणि सुधारणात्मक करारावर स्वाक्षरी करून उर्वरित कालावधीवर तुमचे फ्लेक्सी लोन टर्म लोनमध्ये रूपांतरित करू शकता. वैकल्पिकरित्या, तुम्ही bhflwecare@bajajhousing.co.in वर लिहू शकता आणि विनंती करू शकता. तुम्ही 48 तासांच्या आत प्रतिसादाची अपेक्षा करू शकता.

**22. मला लोन फोरक्लोजरसाठी नवीनतम तपशील कसे मिळू शकेल?**

लोन फोरक्लोजर विषयी माहिती मिळवण्यासाठी, कृपया bhflwecare@bajajhousing.co.in वर लिहा आणि आमची टीम 48 तासांच्या आत तुमच्याशी संपर्क साधेल.

**23. मी माझे लोन फोरक्लोज केल्यानंतर मला माझे मूळ डॉक्युमेंट्स कधी परत मिळतील?**

आमच्या सिस्टीममध्ये तुमचे लोन बंद झाल्यानंतर, तुमचे प्रॉपर्टी पेपर्स रिलीज करण्याची विनंती आमच्या स्टोरेज पार्टनरकडे अंतर्गत स्तरावर केली जाईल. सर्व लिंक केलेले लोन अकाउंट बंद झाल्यानंतर, मूळ डॉक्युमेंट्स लोन क्लोजरच्या तारखेपासून 30 दिवसांच्या आत शाखेपर्यंत पोहोचेल.

आम्हाला आमच्या स्टोरेज पार्टनरकडून डॉक्युमेंट्स प्राप्त झाल्यानंतर, स्थानिक शाखेकडून सर्व्हिस एक्झिक्युटिव्ह जिथे तुमचे लोन बुक करण्यात आले होते ते ईमेलद्वारे तुमच्याशी संपर्क साधतील आणि तुम्ही डॉक्युमेंट्स कलेक्ट करू शकाल तो ॲड्रेस शेअर करतील.

कृपया लक्षात घ्या की डॉक्युमेंट्स केवळ प्रॉपर्टी मालकांना सुपूर्द केले जातील. त्यामुळे, सर्व प्रॉपर्टी मालकांना डॉक्युमेंट्स कलेक्ट करण्यासाठी मूळ फोटो ID सह शाखेला भेट देणे आवश्यक आहे. ओळखीच्या पुराव्यामध्ये समाविष्ट असू शकते:

- PAN कार्ड
- वाहन परवाना
- आधार कार्ड
- मतदान ओळखपत्र

**24. मला नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट कधी आणि कसे मिळू शकेल?**

आमच्या सिस्टीममध्ये लोन बंद झाल्यानंतर, तुम्हाला 3 दिवसांच्या आत सिस्टीम-जनरेटेड लोन क्लोजर लेटर प्राप्त होईल. सर्व लिंक असलेले लोन बंद झाल्यानंतरच नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट जारी केले जाते.

**25. CIBIL मध्ये माझी लोन क्लोजर स्थिती कधी अपडेट केली जाईल?**

तुमचे लोन फोरक्लोज झाल्यानंतर, BHFL त्याला 'क्लोज्ड' म्हणून CIBIL ला रिपोर्ट करते. ही स्थिती सामान्यपणे लोन क्लोजरच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत तुमच्या CIBIL रेकॉर्डमध्ये अपडेट केली जाते.

**26. माझा इंटरेस्ट रेट किती वेळा बदलू शकतो आणि BHFL मला कसे सूचित करेल?**

BHFL, त्यांच्या विवेकबुद्धीनुसार, तुमच्या लोन कालावधीदरम्यान कोणत्याही वेळी तुमचा इंटरेस्ट रेट सुधारित करण्याचा अधिकार राखून ठेवते. हे BHFL FRR मधील बदल, अंतर्गत पॉलिसी, बाह्य नियामक आवश्यकता किंवा लोन डिफॉल्टच्या घटनेमध्ये होऊ शकतात. यात, लोनचे वितरण झाल्यानंतर करारानुसार आवश्यक असलेली डॉक्युमेंट्स सादर करण्यात किंवा त्यांची पूर्तता करण्यात तुमच्याकडून होणाऱ्या कोणत्याही विलंबाचा समावेश होतो.

इंटरेस्ट रेट मधील कोणतीही सुधारणा तुमच्या रजिस्टर्ड ईमेल ID किंवा मोबाईल नंबरवर ईमेल किंवा SMS द्वारे आगाऊ कळविली जाईल. सुधारित रेट पुढील कालावधी साठी लागू असेल.

**27. जर BHFL FRR किंवा रेपो रेट मधील बदलामुळे माझा इंटरेस्ट रेट बदलला तर BHFL मला सुधारित इंटरेस्ट रेट कसा कळवेल?**

तुम्हाला तुमच्या रजिस्टर्ड ईमेल ID किंवा मोबाईल नंबरवर ईमेल किंवा SMS द्वारे पूर्वसूचना प्राप्त होईल.